लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com

विकणे आहे
मौजे नान्नज व अकोलेकाटी ता उत्तर सोलापूर येथील बागायत शेतजमीन सर्व सोयीनियुक्त विकणे आहे शेतामध्ये ५ बोअरवेल, शेततळे, मोटारपंप, सालगडी राहणेसाठी वस्ती, आमराई, ७० फूट खोल विहीर, ड्रीप पाईप लाईन, स्प्रिंकलर, द्राक्ष फाउंडेशनसह विकणे आहे
संपर्क: मनोरमा मल्टीस्टेट नान्नज शाखा
श्री पवार- 8600568860, 9763663792, 9545386261

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक १७ वा | मंगळवार, दि. ३० जुलै २०२४ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

कामिनी गांधी
संस्था, फॅशन डिझायनिंग
सरकारमान्य सर्टिफिकेट
गारमेंट मॅन्यु. अँड फॅशन डिझायनिंग - फर्स्ट ईयर
फॅशन डिझायनिंग अँड फॅशन टेक्नॉलॉजी - सेकंड ईअर
कॉम्प्युटराईज्ड फॅशन डिझायनिंग अॅण्ड टेक्नॉलॉजी - थर्ड ईअर
▶ फॅशन ड्रेस डिझायनिंग
▶ फॅशन ब्लाऊज डिझायनिंग ▶ प्रिंसेस ब्लाऊज ▶ अरी वर्क ▶ पार्टीवेअर गाऊन
एका वर्षात कुटुंबातील कमवता सदस्य व्हा.
या... पहा.. शिका..!
३६३, दक्षिण कसबा, युनिक हॉस्पिटल समोर, जुनी फौजदार चावडी, सोलापूर
9850117867, 9096495025

## बच्चू कडू महायुतीला देणार धक्का

### मनोज जरांगेंना सोबत घेऊन विधानसभा लढविण्याचे संकेत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** येत्या ९ ऑगस्ट रोजी छत्रपती संभाजीनगरमध्ये आम्ही (प्रहार संघटना) मोर्चा काढणार आहोत. त्यातून आम्ही आमची ताकद दाखवू. त्यानंतर आम्ही निर्णय घेऊ. आम्ही अजूनही महायुतीमध्येच आहोत. पण, आम्ही आमची स्वत:ची आघाडी करण्याचा विचार करतोय.

मनोज जरांगे पाटील यांना सोबत घेऊन पुढे जाण्याचा आमचा विचार आहे, असे सांगून आमदार बच्चू कडू यांनी



महायुतीला सोडण्याचा विचार केल्याचे दिसून येते.

माजी मंत्री बच्चू कडू हे आज उमरगा, लातूरच्या दौऱ्यावर आहेत. लातूरला रवाना होण्यापूर्वी सोलापुरातील शासकीय विश्रामगृहात माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी महायुतीला सोडण्याची भाषा करतानाच आम्ही मुद्यावर निवडणूक लढतोय. मनोज जरांगे पाटील हेही मुद्यावर बोलत आहेत. त्यामुळे त्यांना सोबत घेऊन आम्ही पुढे जाऊ, असे बच्चू कडू यांनी स्पष्ट केले. (पान 2 वर..)

## बेरोजगार उमेदवारांसाठी रोजगार मेळाव्याचे 31 जुलैला आयोजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर व कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर तसेच गुरूप्रसाद स्कील डेव्हलपमेंट सेंटर पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दि. 31 जुलै 2024 रोजी रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्याल पंढरपूर येथे पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकताचे प्र.सहायक आयुक्त हनमंत नलावडे यांनी दिली.

या रोजगार मेळाव्यात 10 वी, 12 वी पदवीधर, आयटीआय, डिप्लोमा, इंजिनिअरिंग, जीएनएम, डी.फार्म, एम.एस.डब्लू.बी.सी. एस.बी.सी.ए या शैक्षणिक पात्रतेची एकूण 2 हजार 697 पेक्षा जास्त रिक्तपदे सोलापूर आणि पुणे येथील उद्योजकांनी अधिसुचीत केलेली आहेत. मेळाव्यात सोलापूर औद्योगिक परिसरातील 16 नामांकिमत उद्योजक सहभागी होणार आहेत.

नोकरी इच्छुक उमेदवारांनी आपल्या कागदपत्रासह बुधवार, दिनांक 31 जुलै 2024 रोजी ठीक 10.00 वाजता रयत शिक्षण संस्थचे कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर ता.पंढरपूर जि.सोलापूर येथे (पान 2 वर..)

## मोडनिंब येथे प्रवीण डाळिंब एक खोड तंत्रज्ञान कार्यशाळा संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यात डाळिंबास भौगोलिक मानांकन मिळाले असून सोलापूर जिल्ह्यातील डाळिंब जगाच्या पाठीवर कोणत्याही बाजारपेठेत त्याच्या गुणात्मक वैशिष्ट्यामुळे मागणी वाढत आहे परंतु गेल्या दोन वर्षापूर्वी पासून डाळिंबाच्या बागा अनेक समस्यांमुळे उध्वस्त झाले आहेत आणि शेतकरी आर्थिकदृष्ट्या संकटात सापडला आहे. त्या अनुषंगाने आज माननीय जिल्हाधिकारी सो श्री कुमार आशीर्वाद साहेब यांच्या अध्यक्षतेखाली लोकमंगल सहकारी साखर कारखाना बीबीदारफळ येथील डाळिंब प्लॉट वर प्रत्यक्ष भेट पाहणी कार्यक्रम व मोडनिंब बैरागवाडी येथील प्रवीण माने यांचे शेतावर एक खोड तंत्रज्ञान कार्यशाळा संपन्न झाली डाळिंबातील या समस्यावर शाश्वत प्रतिबंधात्मक उपाययोजना करून प्रवीण माने यांनी डाळिंब शेतकऱ्यांना एक वेगळी दिशा देण्याचा प्रयत्न केला आहे.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तात्रेय गवसाने साहेब, मदन मुकणे कृषी उपसंचालक स्मार्ट सोलापूर, शितल चव्हाण मॅडम प्रकल्प संचालक आत्मा सोलापूर, विनोद रणवरे साहेब तहसीलदार माढा, संजय वाकडे उपविभागीय कृषी अधिकारी कुडूर्वाडी, बी. डी.कदम साहेब तालुका कृषी अधिकारी माढा,मान. शिवाजी राजे कांबळे माजी सभापती जिल्हा परिषद सोलापूर, मा. डॉ.प्रा.श्री प्रशांत कुंभार मोडनिंब व सर्व कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी आणि महाराष्ट्रातून विविध जिल्ह्यातून तसेच कर्नाटक गुजरात राजस्थान आणि आंध्र प्रदेश राज्यातून जवळपास 1500 पेक्षा जास्त शेतकरी उपस्थित होते.

या कार्यशाळेमध्ये डाळिंब एक खोड तंत्रज्ञान याविषयी मा. कुमार आशीर्वाद साहेब त्यांच्या अध्यक्षीय भाषणातून बोलताना म्हणाले की हे एक खोड तंत्रज्ञान जसेच्या तसे शेतकऱ्यांनी अवलंबले तर डाळिंब शेतकरी या समस्येतून मुक्त होईल. याशिवाय हे तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या पर्यंत पोहोचवण्याच्या साठी शासकीय योजनातून निधी देऊन जिल्हा प्रशासन संपूर्ण मदत करेल. याशिवाय ते पुढे म्हणाले माझे सोलापूर येथील शासकीय निवासस्थान जवळील दोन एकर जमिनीवर असा एक खोडतंत्रज्ञानाचा प्लॉट माने साहेबांनी उभा करावा असे आव्हान केले. जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी दत्तात्रय गवसाने साहेब म्हणाले की प्रवीण माने यांनी त्यांच्या शेतावर स्वखर्चाने अहोरात्र गेली दहा वर्ष संशोधन करून हे एक खोड तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी अथक प्रयत्न आणि आज रोजी अनेक शेतकऱ्यांनी असे एक खोड पद्धतीने प्लॉट उभे केलेले शेतकऱ्यांचे चचेर्तून लक्षात आले.तांत्रिक मार्गदर्शन करताना प्रा. प्रशांत कुंभार म्हणाले की डाळिंबाची नैसर्गिक ताकद



ओळखून त्याला पूरक पद्धतीने श्री प्रवीण माने यांनी संशोधित केलेल्या प्रतिबंधात्मक उपाय योजना जर शेतकऱ्यांनी वेळेवर अवलंबल्या तर जमिनीच्या आरोग्य वाढतेच पण डाळिंबातील ज्वलंत समस्या आपोआप कमी होऊन डाळिंबाचे गुणात्मक आणि संख्यात्मक उत्पादन मिळते. त्याचबरोबर डाळिंब पीक उत्पादनाचा खर्च कमी होतो त्यामुळे पैसे श्रम व वेळ बचत होते. प्रवीण माने यांनी त्यांचे एक खोड तंत्रज्ञान विषयी प्रश्न उत्तरांच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे समाधान केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष निळ यांनी केले तर आभार प्रदर्शन गायकवाड साहेब यांनी केले शेवटी सस्नेह भोजनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान: शीतखोली घटकासाठी अर्थसहाय योजना

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यातील सर्वसाधारण, अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती व इतर सर्व प्रवगार्तील शेतक-यांसाठी एकात्मिक फलोत्पादन विकास कार्यक्रम योजनेतर्गत काढणीपश्चात व्यवस्थापण घटकांतर्गत शितखोली या घटकासाठी महा-डीबीटी पोर्टल https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करावेत. असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तात्रय गावसाने यांनी केले आहे.

**प्रकल्पाचे तांत्रिक निकष:** कमाल प्रकल्प क्षमता 30 मे. टन प्रतिदिवस प्रति युनिट असणे आवश्यक राहील. शीतखोलीची क्षमता 30 मे. टनापेक्षा कमी असल्यास यथाप्रमाणाआधारे (Prorata Basis) अनुदान अनुज्ञेय राहील. तथापि, किमान प्रकल्पक्षमता 5 मे. टन प्रति युनिट असणे आवश्यक राहील.

शीतखोलीस सौर / अक्षय ऊर्जा स्त्रोत वापरल्यास 100 टक्के कर रक्कम प्रकल्प खर्चात ग्राह्य धरण्यात येईल.

**अर्थसहाय्याचे स्वरुप :** सर्वसाधारण क्षेत्रासाठी साठवण क्षमता विचारात घेवून ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या 35 टक्के किंवा कमाल रु. 5.25 लाख अर्थसहाय्य देय आहे. अर्थसहाय्यासाठी भांडवली खर्चाच्या बाबी ग्राहय धरण्यात येतील.

**लाभार्थी निवडीचे निकष:** शेतकरी, शेतकरी उत्पादक गट, भागीदारी संस्था, मालकी संस्था, नोंदणीकृत स्वयंसहाय्यता गट, नोंदणीकृत उत्पादक संघ (ज्यामध्ये कमीतकमी 25 सदस्य असतील), शेतकरी उत्पादक कंपनी, तसेच वैयक्तिक शेतकरी, भागीदारी संस्था, मालकी संस्था, नोंदणीकृत स्वयंसहाय्यता गट (ज्यामध्ये किमान 15 सदस्य असतील), शेतकरी उत्पादक कंपनी, कंपनी, शेतकरी गट यांचेसाठी अर्थसहाय्य हे बँक कजार्शी निगडीत बँक कर्जाच्या परताव्याच्या स्वरुपात अनुदान देय राहील

जिल्हयातील सर्वसाधारण, अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती व इतर सर्व प्रवगार्तील शेतक-यांनी या घटकाचा लाभ घेण्यासाठी महा-डीबीटी पोर्टल https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करावेत. अधिक माहितीसाठी संबंधीत नजीकच्या कृषि कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहनही जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तात्रय गावसाने यांनी केले आहे.

निरामय पॅरालिसिस सेंटर
निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा आणि फिजिओथेरपी सेंटर
कितीही जुने पॅरालिसिस असो, आयुर्वेदिक उपचार पद्धतीने १५ ते २० दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते.
हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे, बेडवर आहात? काळजी करू नका.. खात्रीशीर उपचार १००% गॅरंटी आयुर्वेदिक तज्ज्ञांच्या निगराणीमध्ये
नातं आपुलकीचं, विश्वासाचं, जिव्हाळ्याचं, माणुसकीच अन् आधाराचं..
समाजातील प्रत्येक घटकाशी आपुलकीचे व माणुसकीचं नात जपणारी संस्था
खंडोबा माळ रोड, लोहगाव, पुणे
संपर्क: 9503310568






## संपादकीय

# आयोगाची 'निती'

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी यावर्षीच्या केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये भाजपची सत्ता नसलेल्या राज्यांबाबत दुजाभाव केल्याचा आरोप अद्याप चर्चेत असतानाच दोन दिवसांपूर्वी झालेल्या निती आयोगाच्या बैठकीतही पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी आपल्यावर अन्याय झाल्याचा आरोप केला आहे. आयोगाच्या बैठकीमध्ये आपल्याला बोलू दिले नाही आणि आपला माइक ऑफ केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. देशाच्या आर्थिक विकासाचे नियोजन ठरवण्यासाठी जो निती आयोग स्थापन करण्यात आला आहे त्या आयोगाच्या बैठकीला नेहमी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना निमंत्रण देण्यात येत असते. पण या बैठकीला सर्वांना निमंत्रण देण्यात येऊनसुद्धा विरोधी पक्षांपैकी फक्त ममता बॅनर्जी या एकट्याच उपस्थित होत्या.

साहजिकच विरोधी पक्षांच्या प्रतिनिधी मुख्यमंत्री म्हणून आपल्याला मान मिळायला हवा होता अशी त्यांची अपेक्षा होती. पण भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री किंवा केंद्रातील भाजप सरकारला पाठिंबा दिलेल्या आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांना या बैठकीमध्ये बोलण्यासाठी जेवढा वेळ दिला तेवढा आपल्याला मिळाला नसल्याचा आरोप ममता बॅनर्जी यांनी केला आहे. सरकारच्या प्रवक्त्याने आणि निती आयोगानेसुद्धा हा आरोप फेटाळून लावला असला तरी पुन्हा एकदा केंद्र सरकारकडून राज्यांबाबत दुजाभाव होत असल्याचा आरोप होत आहे, हे गांभीर्याने घ्यावे लागणार आहे. एकतर ९ वर्षापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या पहिल्याच कार्यकाळामध्ये देशात दीर्घकाळ अस्तित्वात असलेल्या नियोजन आयोगाचे काम थांबवून त्याऐवजी निती आयोगाची स्थापना केली होती.

'नॅशनल इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मिंग इंडिया' या नावाने म्हणजेच 'निती' आयोग या नावाने स्थापन करण्यात आलेल्या या संस्थेमध्ये सर्व राज्यांचे मुख्यमंत्री सदस्य असतात आणि कोणताही धोरणात्मक किंवा विकासात्मक निर्णय घेताना सामूहिकपणे या आयोगाच्या बैठकीमध्ये घेणे अपेक्षित असते. ठराविक कालावधीनंतर निती आयोगाच्या गव्हर्नमेंट काउन्सिलच्या बैठका होत असतात. सर्व राज्यांच्या विकासाच्या माध्यमातून देशाचा एकात्मिक विकास करणे असे जरी या संस्थेचे ध्येय असले तरी गेल्या ९ वर्षांच्या कालावधीमध्ये निती आयोगाच्या कामाचा कुठे फारसा बोलबाला झाला आहे असे दिसत नाही. विरोधी पक्षांनी सातत्याने या संस्थेवर केलेल्या टीकेमुळेच हा आयोग नेहमी चर्चेत राहत आहे.

खरेतर गेल्या 75 वर्षांच्या कालावधीमध्ये भारताने जो विकास केला आहे त्याला कारणीभूत पंचवार्षिक नियोजन हेच होते. 1951 पासून पहिल्या पंचवार्षिक योजनेला सुरुवात झाली होती. पण मोदी सरकारने 2017 मध्ये तेराव्या पंचवार्षिक योजनेनंतर पंचवार्षिक विकासाला सुद्धा पूर्णविराम दिला. नियोजन मंडळाचे काम या पंचवार्षिक योजना तयार करणे आणि त्या माध्यमातून नियोजनबद्ध पद्धतीने विकास करणे हेच होते. पण आता पंचवार्षिक योजनाही संपुष्टात आल्या असल्याने निती आयोगाच्या ज्या बैठका होत असतात त्याच माध्यमातून देशाची विकासाची दिशा ठरवण्याचे प्रयत्न केले जात असतात. अशावेळी सर्वच राज्यांच्या प्रतिनिधींनी अशा चर्चेमध्ये सहभागी होणे आवश्यक असते. पण गेल्या काही वर्षापासून भाजपची सत्ता नसलेल्या राज्यातील मुख्यमंत्री निती आयोगाच्या बैठकीला उपस्थित राहत नाहीत असेच चित्र दिसत आहे. खरेतर एक प्रकारे त्यामुळे केंद्रातील मोदी सरकारला आयते कारण मिळत आहे. तुम्ही जर निती आयोगाच्या बैठकीला उपस्थित राहिला तर तुमच्या राज्यांच्या विकासाबाबत कोणताही निर्णय घेता येऊ शकेल, असे अप्रत्यक्षरीत्या अनेक वेळा सत्ताधार्‍यांनी सुचवले आहे. पण बैठकीला उपस्थित राहूनही जर संबंधित मुख्यमंत्र्यांना आपली बाजू मांडण्यासाठी पुरेसा कालावधी दिला जात नसेल, तर अशा बैठकांचा काय उपयोग आहे, असाच प्रश्न आता विचारावा लागणार आहे. निती आयोग फक्त नावापुरता आहे. प्रत्यक्षात तो पंतप्रधान कार्यालयाच्या हातातील बाहुले आहे असा आरोप यापूर्वी अनेक वेळा करण्यात आला आहे. अर्थात, पूर्वीचा नियोजन आयोग असो किंवा सध्याचा निती आयोग असो या आयोगांच्या पदसिद्ध अध्यक्षपदी नेहमीच पंतप्रधान असतात.

पूर्वीच्या नियोजन आयोगाच्या कालावधीमध्ये पंतप्रधान अनेक वेळा नाममात्रपणे आपली जबाबदारी पूर्ण करत असत आणि नियोजन मंडळ आयोगाचे उपाध्यक्ष आणि इतर सदस्य सर्व महत्त्वाची जबाबदारी पार पाडत असत. आता मात्र निती आयोगाच्या बैठकीमध्ये पंतप्रधान सक्रियपणे काम करताना दिसत आहेत. दोन दिवसांपूर्वी झालेल्या बैठकीमध्ये बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला विकसित राष्ट्र बनवायचे असेल तर राज्यांची भूमिका महत्त्वाची आहे, असे विधान केले आहे. पंतप्रधान अशा प्रकारची भूमिका स्पष्ट करत असतानाच त्यांच्या नेतृत्वाखालील सरकारकडून राज्यांबरोबर दुजाभाव केल्याचा आरोप केला जात आहे आणि अशा बैठकीतून एक मुख्यमंत्री सभात्याग करत आहेत हेसुद्धा नाकारून चालणार नाही. निती आयोगाच्या माध्यमातून देशाच्या विकासाला दिशा देण्याचे काम जरी होत असले तरी ही दिशा कशा प्रकारची असावी हे ठरवण्याचे काम पंतप्रधानांचे कार्यालय करते असेच दिसून येत आहे. सध्या निती आयोगाची 'नीती' त्याच प्रकारे कार्यरत होताना दिसत आहे. भारतीय लोकशाहीमध्ये जरी यापूर्वीही केंद्रात सत्तेवर असलेल्या पक्षाने ज्या राज्यात आपली सत्ता नाही त्या राज्यांबाबत दुजाभाव केल्याची उदाहरणे असली, तरी नियोजन आयोगासारख्या महत्त्वाच्या संस्थांच्या व्यासपीठावर हा सापत्नभाव कधी समोर आला नव्हता. पण आता राजकीय अपरिहार्यतेतून विद्यमान सत्ताधाऱ्यांना तशाच प्रकारे निती आयोगाचे कामकाज रेटावे लागणार आहे, असे संकेत मिळत आहेत. तेलगू देशम आणि जनता दल युनायटेड या दोन राजकीय पक्षांच्या पाठिंब्यावर हे सरकार उभे असल्याने बिहार किंवा आंध्र प्रदेश या राज्यांना येत्या काही कालावधीमध्ये झुकते माप मिळणार. ममता बॅनर्जी यांनी केलेल्या आरोपानंतर आणि तामिळनाडूचे मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी केलेल्या टीकेनंतर एक गोष्ट निश्चितच समोर येत आहे की विद्यमान निती आयोगाने फक्त पंतप्रधान कार्यालयाचे ऐकायचीच 'नीती' स्वीकारली आहे.


पान १ वरून


## बेरोजगार उमेदवारांसाठी रोजगार...

मुलाखतीसाठी उपस्थित रहावे.

याबाबत काही अडचण आल्यास कार्यालयाच्या 0217-2992956 या दुरध्वनीवर अथवा प्रत्यक्ष भेटीद्वारे जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थकोट, पार्क चौक, सोलापूर येथे संपर्क साधवा, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकताचे प्र. सहायक आयुक्त हनमंत नलावडे यांनी केले आहे.

# राज्यातील सर्वक्षेत्रातील अभ्यासक व कर्तृत्ववान, सक्षम खंबीर नेतृत्व इंजि मिलिंद भोसले साहेब












सदर व्यक्तीमत्वाच्या नावाबद्दल राज्यात सगळ्यांना एक वेगळा प्रकारचा आत्मविश्वास आहे, एक आपलेपणा, आत्मीयता जिथे अनुभवायला येते असे राज्याचे बहुआयामी नेतृत्व म्हणजेच मिलिंदजी.

शासनाने १९८६ साली झिरो बजेट लावले याचा राज्यातील खास करून स्थापत्य अभियंता यांच्या सरकारी नोकरीवर फार मोठा पायबंद घातला गेला पण अशा निर्णयामुळे न डगमगता स्वतचा व्यवसाय सुरू केला नुसता व्यवसाय न करता आपल्याच सहकारी साठी राज्यभर सुशिक्षित बेरोजगार अभियंताची फार मोठी संघटना स्वतच्या कार्यशैली वर उभा केली या माध्यमातून इतरांना रोजगाराची व भाकरी निर्माण करण्याची फार मोठी संधी उपलब्ध करून दिली, तसेच शासन दरबारी विविध स्तरावर व शासनाच्या विविध विभागात अहोरात्र जबरदस्त पाठपुरावा करून जवळपास विविध खात्याचे पंचवीस शासन निर्णय या अभियंता व कंत्राटदारांसाठी काढुन घेतले यामुळेच आज तो अभियंता व कंत्राटदार राज्यात ताठ मानेने उभा आहे याचे सर्वश्रेय याच सर्वगुणसंपन्न व्यक्तिमत्वास जाते.ही सत्य बाब आहे.

अशा वेळी ही राज्यातील अभियंत्याची संघटना सक्षम व मजबूत करीत असताना राज्यातील छोटे मोठे कंत्राटदार हे प्रंचड अडीअडचणीतून जात होती, यासाठी आपले सर्वस्व कौशल्य, बुद्धी चातुर्य व मेहनत, पाठपुरावा पणाला लावून राज्यातील एकमेव असे सर्व क्षेत्रातील कंत्राटदारांचे महासंघ स्थापन केले आज हे महासंघ राज्यातील शासन, प्रशासन व राजकीय मंडळ यांच्या बरोबर बैठका, चर्चा करून प्रत्येक बाबी मध्ये आपले कार्यसिद्धीस नेत आहे याचा प्रत्यय राज्यातील सुबे अभियंता, छोटे मोठे कंत्राटदार, मजुर संस्था यांना याचा पावलोपावली येत आहे.

सदर या महत्त्वाच्या गोष्टी करीत असताना राज्याच्या, जिल्हाच्या व शहराच्या विकासासाठी, सामाजिक साठी, औद्योगिक साठी, योजनांच्या, सुधारणासाठी सतत वेगवेगळ्या स्तरावर काम करीत कायम आपली कार्यशैली च्या माध्यमातून सामान्य जनतेला व त्यांच्या महत्त्वाचे प्रश्नास नुसता न्याय दिला नाहीतर सामान्य जनतेच्या रोजीरोटी मध्ये त्याचे रुपांतर करण्यात सदर यक्तीमत्व यशस्वी झालेले आहे. एक निस्वार्थी पणाने केलेल्या विविध क्षेत्रातील कायार्मुळे आज मिलिंदजी भोसले यांचे नाव राज्यातील सर्व क्षेत्रात आदराने घेतले जाते इतकेच नव्हे तर राज्यात मुंबई, मंत्रालय, सचिवालय व इतर अनेक शहराच्या कार्यक्षेत्रातील काम करीत असताना जिथे जिथे मिलिंदजी यांचे नाव असते तिथे समोरील शासन, प्रशासन, राजकीय व्होरा सदर काम हे तातडीने कार्यत्वास व तडीस नेले जाते एवढा विश्वास या नावातच या पंचवीस वर्षात विविध क्षेत्रातील केलेल्या कार्य व कामामुळे निर्माण झाला आहे.

अशा बहुआयामी नेतृत्वाखाली आम्ही गेले पंचवीस वर्ष कार्यरत आहोत जिवनातील एवढा वेळ या कामासाठी कसे काय देता अशी विचारणा केल्यावर त्यांचे एकच महणणे असते इतरांच्या जिवनात आंनद व भाकरी जेव्हा आपण आपल्या हाताने व या देहाने निर्माण करतो तेव्हा परमेश्वर व नियती ही आपल्यासाठी कुठे ना कुठे आपल्यासाठी तजवीज करतेच यातच आपण समाधान मानायचे. तरी आज अशा बुद्धिवान, निस्वार्थी नेत्याची देशास व राज्यास अशा बिकट परिस्थितीत जनतेमध्ये जिवनात भक्कम आशावाद निर्माण करण्यासाठी खरंच गरज आहे, ती संधी मिलिंदजीना मिळावी हीच आजच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आमच्या मनोमनी इच्छा आम्ही व्यक्त करीत आहोत.

**शुभेच्छुक :** महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ राज्य अभियंता संघटना, मजुर सहकारी संस्था,सुशिक्षित बेरोजगाराची स्यवंयरोजगार सहकारी सेवा संस्था संघटना, महाराष्ट्र राज्य कन्स्ट्रक्शन फोरम,वेक अप सोलापूर फौडेशन, सोलापूर विकास मंच, स्वयंसेवी संघटना, इंजिनिअरिंग कौन्सिल ऑफ इंडिया नवी दिल्ली.

# विठ्ठल नामाची शाळा भरली...

गेल्याच आठवड्यात आषाढी वारी झाली मी माज्या शाळेत त्यानिमित्त तयारी सुरू केली काहीतरी वेगळा उपक्रम घ्यावा ज्यामुळे तो दिवस अवस्मरणीय होईल. माज्या सहकाऱ्यांशी चर्चा केली सर्वांनी ठरवले आपण यावर्षी विज्ञान वारी काढूया गेल्याच वर्षी शैक्षणिक वारीचा उपक्रम झाला होता .मग विज्ञान वारीत काय करायचे? काय नवीन आणायचे? समाज प्रबोधन कसे करायचे त्याचबरोबर परंपरा संस्कृती भक्ती यालाही स्थान द्यायचे. हा विचार सुरू होता शेवटी ठरले की आपण या विज्ञान वारीत विठ्ठलाला बोलवायचे, तो माज्या शाळेच्या छोट्या वारकऱ्यांसाठी नक्की येणार. माझ्या शाळेच्या पंढरीत विठ्ठलाला बोलण्यासाठी विज्ञान वारीचे साकडे घातले



गेले मोठे सुंदर अवकाश यान बनवले .सर्व विद्यार्थी व शिक्षक यात मग्न झाले. ते यान कसे उडवायचे आणखी त्यासाठी काय साहित्य बनवायचे मग त्यात ग्रह आले, तारे आले अंतराळवीर आले, वैज्ञानिक वस्तूंचा संग्रह आला जसे कीर्तनातून अभंगातून विठ्ठल नामाचा जागर होतो तसेच पथनाट्य सादर झाले "पाऊले चालती विज्ञानाची वाट अंधश्रद्धेची सोडुनिया पाठ" असे स्वर घुमले छोटे वारकरी ग्रंथदिंडी घेऊन पाऊल खेळत निघाले आणि खरंच त्या वारीत ज्ञानेश्वर मुक्ताई तुकाराम रखुमाई सगळे झाले माझा भोळा विठ्ठल ही मग कसा थांबेल तोही आमच्यात मिसळला तो म्हणाला, "अरे वेड्यांनो मी इथेच तर आहे, या चिमुकल्यात त्यांच्या हसण्यात खेळण्यात बागडण्यात हे सर्व जाती-धर्माचे पंथाचे संप्रदायाचे लोक एकत्र येऊन तल्लीन होतात तेव्हा ना कोणी गरीब ना कोणी श्रीमंत ना कोणी उच्च ना कोणी नीच सगळेच एका भक्तिमार्गावरील सेवक बनतात." खरंच मित्रांनो त्या दिवशी मी माज्या शाळेच्या पंढरीत विठ्ठल पाहिला आणि धन्य झाले. विठ्ठला मी जरी येऊ नाही शकले तरी तू मला माज्या या विद्यार्थ्यात येऊन भेटत जा अशी मनोमन प्रार्थना केली धन्य माझी शाळा, धन्य माझा विठ्ठल, धन्य माझी पंढरी.

# अकलूज एस टी आगारात प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन साजरा

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज येथील नवीन बसस्थानक येथे विभागाच्या वेळापत्रकाप्रमाणे अकलूज आगारामध्ये सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत प्रवासी राजा दिन साजरा करण्यात आला तर दुपारी २ ते ५ या वेळेत कामगार पालक दिन साजरा करण्यात आला.या अभियानाची संकल्पना डॉ. माधवजी कुसेकर,उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांची असून या अभियानाचा उद्देश प्रवासी व कामगार यांच्या अडीअडचणी प्रत्यक्ष विभाग नियंत्रक यांनी ऐकून घेऊन त्यावर लवकरात लवकर तोडगा काढून तक्रारीचे निवारण करणे हा आहे. त्याअनुषंगाने अकलूज आगारात विनोदकुमार भालेराव, विभाग नियंत्रक,अजय पाटील, विभागीय वाहतूक अधिकारी व घाटगे साहेब, कामगार अधिकारी या सोलापूर विभागीय कार्यालयातील अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष येऊन सकाळी १० ते दुपारी ५ या वेळेत प्रवासी व कामगार यांच्या अडी



अडचणी समजून घेऊन त्यावर उपाय योजना करून अडचणी तत्काळ सोडविण्याबाबत आगार प्रशासनास आदेश दिले व त्याबाबत मार्गदर्शन केले.

या अभियानाच्या दिवशी प्रवासी तक्रार एक व कामगार तक्रारी पाच प्राप्त झाल्या असून तक्रारींचे निराकरण तत्काळ करण्यात आले आहे.प्रवासी व कामगार यांच्या तक्रारी ऐकून घेण्यासाठी व त्यावर उपाय योजना करण्यासाठी विभागीय अधिकाऱ्यांसोबत आगारातील अधिकारी प्रमोद शिंदे आगार व्यवस्थापक, केतन सोनवलकर, स्थानक प्रमुख, पंकज सावंत आगार लेखकार, विजय रंदवे, वाहतूक नियंत्रक हे उपस्थित होते.

# सिटू च्यावतीने स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला भव्य वक्तृत्व स्पर्धा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विद्यार्थ्यांना संवाद कौशल्य विकसित करण्यात मदत व्हावी, सार्वजनिक बोलण्याचे कौशल्य वाढीस लागावे, तसेच विद्यार्थ्यांना नवीन कल्पना आणि दृष्टिकोन शोधण्यासाठी प्रोत्साहित करण्याच्या हेतून उक्ळव अर्थात सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्सच्या वतीने स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला अर्थात १४ ऑगस्ट २०२४ रोजी डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह सोलापूर येथे संध्याकाळी ५ च्या पुढे पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी 'जागर स्वातंत्र्याचा- वक्तृत्व स्पर्धा २०२४' चे आयोजन करण्यात आले आहे. विजेत्या स्पर्धकांना प्रथम क्रमांक : ११०००/- रू. रोख व आकर्षक स्मृतिचिन्ह

द्वितीय क्रमांकः ७०००/- रु. रोख व आकर्षक स्मृतीचिन्ह

तृतीय क्रमांकः ५०००/- रु.रोख व आकर्षक स्मृतीचिन्ह

उत्तेजनार्थ-१: ३०००/- रु.रोख व आकर्षक स्मृतीचिन्ह

उत्तेजनार्थ-२: ३०००/- रु. रोख व आकर्षक स्मृतीचिन्ह असे बक्षीसे देण्यात येणार आहेत. तसेच प्रत्येक सहभागी स्पधार्काला सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल.

**वक्तृत्व स्पर्धेचे विषयः**

- मार्क्स आणि भगतसिंग यांच्या संकल्पनेतील समाजव्यवस्था
- शैक्षणिक धोरण आणि वाढती बेरोजगारी
- स्वातंत्र्योत्तर काळातील गांधीवाद
- संविधान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर
- प्रसार माध्यमांचे राजकारण; लोकशाही पुढील आव्हान
- आरक्षणाचा सामाजिक आक्रोश
- धर्मनिरपेक्ष भारतातलं वास्तव
- आंदोलने भारतीय लोकशाहीला नवसंजीवनी देतील का.

दत्तनगर येथील सिटूच्या मध्यवर्ती कार्यालयात प्रवेशिका मिळतील. प्रवेशिका स्वीकारण्याची अंतिम तारीख दिनांक 8 ऑगस्ट 2024 आहे. तरी सोलापूर शहर व जिल्ह्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील स्पर्धकांनी या स्पर्धेत भाग घ्यावा असे आवाहन वक्तृत्व स्पर्धा समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

**अधिक माहितीसाठी संपर्क**

- प्रा.इलियास सिद्दिकी (९८६०७५९५२७),
- ॲड.अनिलवासम (९३७३५७९१८९),
- दत्ता चव्हाण (९७६७०६५८६१),
- मल्लेशम कारमपुरी (८६०५७२७५४५ )

# पर्यटन विभागाचे आता एकच बोधचिन्ह व घोषवाक्य : पर्यटन मंत्री गिरीश महाजन

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** पर्यटन संचालनालय तसेच महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ या दोन प्रमुख संस्था पर्यटन विभागाच्या अधिनस्त असल्या तरी त्यांचे बोधचिन्ह, घोषवाक्य यामध्ये तफावत होती, ती आता दूर करण्यात आली आहे. आता 'महाराष्ट्र टुरिझम' हे बोधचिन्ह (लोगो), 'महाराष्ट्र अनलिमिटेड' हे घोषवाक्य (टॅग लाईन) असेल, असा निर्णय घेण्यात आल्याचे पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले.

Logo | Tagline

पर्यटन विभागाच्या अंतर्गत असलेल्या पर्यटन संचालनालय तसेच महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांच्यामार्फत वापरण्यात येणारे बोधचिन्ह (लोगो) तसेच घोषवाक्य हे स्वतंत्र वेगळ्या स्वरूपातील होते. मात्र आता पर्यटन विभागाला एकच घोषवाक्य असणार आहे.

राज्यातील पर्यटन स्थळांची राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी, प्रचार करून पर्यटन वाढीला चालना देण्यासाठी शासन कार्यरत आहे. देशातील एक अग्रगण्य राज्य बनवून मोठ्या प्रमाणात पर्यटकांना आकर्षित करण्याकरता नुकतेच 'पर्यटन धोरण 2024' राज्यात जारी करण्यात आले आहे. येत्या काळामध्ये राज्यातील पर्यटन वाढीसाठी महत्त्वपूर्ण योजना आणि उपक्रम या धोरणाअंतर्गत राबविण्यात येणार आहेत असेही मंत्री श्री.महाजन यांनी सांगितले.

## बच्चू कडू महायुतीला देणार धक्का...

ते म्हणाले, आम्हाला तिसरी आघाडी म्हणू नका. आम्हीच पाहिली आघाडी आहोत. आमची आघाडी ही मूळ शेतकऱ्यांची आघाडी आहे. ज्या योजना काँग्रेसने करण्याचा प्रयत्न केला, तेच जरं युती करणार असेल तर त्याला काय अर्थ आहे.

आमचे 16 मुद्दे आहेत ते जर मान्य होतं असतील तर कोणीही मान्य करेल त्या आघाडी अथवा युतीला आमचा पाठिंबा असेल. आम्ही मुद्यावर लढतोय आम्हला विधानसेभेची अपेक्षा नाही. मुद्दा मान्य झाला तर ज्यांनी मान्य केला त्यांना आम्ही पाठिंबा देणार आहोत, असेही बच्चू कडू यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आणायला आमची काही हरकत नाही. पण, योजना कोणासाठी हे पहिलं पाहिजे, असेही बच्चू कडू यांनी म्हटले आहे. संघटनेच्या कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल होण्याबाबतही बच्चू कडू यांनी आपले मत नोंदविले आहे.

गुन्हा हा राजकीय कार्यकर्त्यांचा अलंकार आहे. तो कार्यकर्त्यांनी अभिमानाने स्वीकारला पाहिजे आणि मिरविला पाहिजे. माज्यावर साडेतीनशे गुन्हे दाखल आहेत. आंदोलन करताना गुन्हे दाखल होतात, ते मोठ्या मनाने स्वीकारले पाहिजेत, असेही त्यांनी म्हटले आहे.

## गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांची अरण येथील संत शिरोमणी सावता महाराज मंदिरास भेट

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्याचे गृहनिर्माण व इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी माढा तालुक्याच्या अरण येथील संत शिरोमणी सावता महाराज मंदिरास भेट देऊन दर्शन घेतले. यावेळी संत शिरोमणी सावता महाराज मंदिर देवस्थान समितीचे अध्यक्ष लक्ष्मण तुकाराम जाधव, सचिव विजय शिंदे, विश्वस्त एस. डी. कुलकर्णी, घनश्याम पाटील, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयाच्या सहाय्यक संचालक मनीषा फुले व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ग्रामस्थांनी राज्य परिवहन महामंडळाचे स्वतंत्र बस स्थानक अरण येथे देण्याची मागणी मंत्री महोदय यांच्याकडे केली.

### वात्रटिका

**राजकीय डरकाळ्या**

गुरगुर करू लागले
आता चित्रातील वाघ...
झाकून ठेवलेले कोंबडे
जोराने देऊ लागले बांग...
पातळी सोडून बोलणे
पुरूषांची मक्तेदारी नाही...
राजकारणात आहे तर
मग बोलणारच बाई...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# जरांगेचा लढा मराठा आरक्षणासाठी नव्हे तर, फडणवीसांना टार्गेट करण्यासाठी..!

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** मराठा समाजाच्या नावाखाली मनोज जरांगेनी महाविकास आघाडीची सुपारी घेत राजकीय वरदहस्त मिळवण्याचा प्रयत्न केला आहे. मराठा आरक्षणाबाबत मनोज जरांगेंची भूमिका, लढा योग्य आहे. त्यावर महायुतीचे सरकार विचाराधीन आहे. पण, मनोज जरांगे हे फक्त उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर टीका करीत असल्याने जरांगे यांच्या स्क्रिप्टमागे सिल्वर ओकचा अदृश्य हात आहे. त्यामुळे मनोज जरांगेचा लढा मराठा आरक्षणासाठी नसून फक्त फडणवीसांना टार्गेट करण्यासाठी असल्याची जोरदार टीका भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांनी केली आहे.



मराठा आरक्षणाचा लढा देणारे मनोज जरांगे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर गंभीर आरोप केले आहेत. या आरोपांनंतर भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांनी जरांगेंवर टीकास्त्र सोडले आहे. यावेळी बोलताना चेतनसिंह केदार-सावंत म्हणाले की, जरांगे यांनी आमच्या नेतृत्वावर बोलू नये. फडणवीस यांनीच सर्वात आधी मराठा समाजाला आरक्षण दिलं आहे, हे संपूर्ण राज्याला माहीत आहे. जरांगे यांच्यामागे सिल्व्हर ओकचा अदृश्य हात असून त्यांचीच स्क्रीप्ट वाचत असल्याचा आरोप चेतनसिंह केदार-सावंत यांनी केला.

देवेंद्र फडणवीस यांचं राजकारणातलं योगदान आणि त्यांनी मराठा आरक्षणासाठी घेतलेली भूमिका आणि केलेलं काम यांचा जरांगे पाटलांनी अगोदर अभ्यास करावा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कायदेशीर समिती गठन करून मागासवर्गीय आयोग नेमून त्यांचा अहवाल घेऊन कोर्टामध्ये टिकणारं मराठा आरक्षण दिलेलं आहे.मनोज जरांगे यांनी मराठा समाजाच्या भावनांशी खेळ मांडला आहे. त्यांना आता सत्तेची आस लागलेली आहे.

महायुतीच्या सरकारने मराठा आरक्षणाबाबत सकारात्मकता दाखवली. मात्र, मराठा आरक्षणाचा विषय धगधगत राहून विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला कशी मदत होईल, याची काळजी घेण्याचे काम मनोज जरांगे करीत आहेत. मनोज जरांगे हे शरद पवार, उध्दव ठाकरे यांचीच स्क्रिप्ट वाचून जाणीवपूर्वक देवेंद्र फडणवीसांना टार्गेट करीत असल्याचा आरोप भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांनी केला.

# मुख्यमंत्र्यांनी घेतले दिव्यांग कल्याणाचे निर्णय

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील दिव्यांग बांधवांना यंदा देखील रोजगार, स्वयंरोजगारासाठी ई-रिक्षा वाटप करण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला. दिव्यांग बांधवांना एकाच छताखाली प्रशिक्षण, समुपदेशन, वैद्यकीय सहायता यासर्व सुविधा देणारे पुनर्वसन केंद्र सर्व महापालिकांनी सुरू करावे, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी आज येथे दिले. दिव्यांगांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणारी योजना तयार करतानाच कजार्ची रक्कम अडीच लाख रुपयांपर्यंत करण्यात यावी, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथे दिव्यांग कल्याण महामंडळाची बैठक झाली. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. बैठकीस उद्योगमंत्री उदय सामंत, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव सुमंत



भांगे, महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अभय करगुटकर आदी उपस्थित होते.

दिव्यांग महामंडळाला ५०० कोटी रुपयांचे भागभांडवल असून दिव्यांग बांधवांसाठी कर्ज देण्याची मयार्दा ५० हजार रुपये आहे ती वाढवून अडीच लाख रुपये करण्याचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिले. त्यांना रोजगार स्वयंरोजगासाठी कौशल्य प्रशिक्षण देणारी योजना कौशल्य विकास विभागाच्या सहकार्याने करावी जेणे करून दिव्यांग बांधवांना रोजगाराची संधी मिळेल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. दिव्यांग बांधवांना एकाच छताखाली वसतीगृहाची सोय, प्रशिक्षण, समुपदेशन, वैद्यकीय सहायता मिळावी यासाठी पुनर्वसन केंद्र तयार करण्यात यावे. प्रत्येक महापालिकेमध्ये असे केंद्र तयार करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

केंद्र सरकारच्या योजनांचा राज्यातील दिव्यांगांना जास्तीतजास्त लाभ मिळेल यासाठी विभागाने आणि महामंडळाने प्रयत्न करावे. कर्ज वाटप प्रक्रीया फास्ट ट्रॅकवर आणावी त्यासाठी मोबाईल अॅप, हेल्पलाईन यासारख्या तंत्रज्ञानाची मदत घ्यावी. दिव्यांगांना उच्च शिक्षणासाठीची कर्ज योजना आहे त्याबाबत जाणीवजागृती करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

गेल्या वर्षी महामंडळामार्फत बॅटरीवर चालणाऱ्या ७९७ रिक्षा दिव्यांगांना स्वयंरोजगारासाठी मंजूर करण्यात आल्या. त्यापैकी ६०० रिक्षांचे वाटप करण्यात आले असून यावर्षी देखील ६६७ रिक्षा खरेदी करण्यासाठी आजच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

# ग्रामपंचायत मोडनिंब ता.माढा जि.सोलापूर

## टेंडर नोटीस

१५ वा वित्त आयोगातील कामांची निवीदा पुढीलप्रमाणे:

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत | ठेकेदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | वार्ड क्र.४ मध्ये आवश्यक ठिकाणी भु.गटार | १०८४२३/- | १०८४/- | ५००/- | ३ महिने | सु.बे.अ. |
| २) | वार्ड क्र.४ पोपट माळी घर ते उमेश गायकवाड भु.गटार | १३३१०६/- | १३३१/- | ५००/- | ३ महिने | सु.बे.अ. |
| ३) | वार्ड क्र.४ संतोष चव्हाण घर ते गणेश मंदीर भु. गटार करणे. | १३३१०६/- | १३३१/- | ५००/- | ३ महिने | सु.बे.अ. |
| ४) | वार्ड क्र.४ बाबू व्यवहारे घर ते मारुती मंदीर भु. गटार करणे. | १३३१०६/- | १३३१/- | ५००/- | ३ महिने | सु.बे.अ. |
| ५) | गणेश मंदीर, मारुती मारुती मंदीर, शशीकांत ओहोळ घर ते महेश कसबे घर या परीसरात नविन बोरवेल पाडणे व पाणी पुरवठा करणे. | ३८९१७८/- | ३८९२/- | ५००/- | ३ महिने | सु.बे.अ. |
| ६) | वार्ड क्र.४ हायमास्ट दिवे दुरुस्ती करणे. | १००००० /- | १०००/- | २००/- | ३महिने | सु.बे.अ. वर्ग५वि.ठे. |
| ७) | वार्ड क्र.४ सौर पथदिवे उभरणी करणे. | १८६४३१/- | १८६४/- | २००/- | ३महिने | सु.बे.अ. वर्ग५वि.ठे. |
| ८) | वार्ड क्र.४ गोरे नगर वस्ती येथील खुल्या जागेला कंपाऊड व बगीच्या करणे. | १८४१८२/- | १८४२/- | २००/- | ३ महिने | सु.बे.अ. |
| ९) | गाववेस ते गावओढा भूमिगत गटार करणे. | ८३८२७/- | ८३८/- | ५००/- | ३ महिने | सु.बे.अ. |
| १० | महाडीक घर ते औदुंबर हागे ते करकंब रस्ता भु.गटार दुरुस्ती. | ७९४१३/- | ७९४/- | ५००/- | ३ महिने | सु.बे.अ. |
| ११ | यमाई मंदीर बोअर व सौरपंप | २८२६४३/- | २८२६/- | ५००/- | ३ महिने | सु.बे.अ. |
| १२ | गजेंद व्यवहारे वस्ती रिबोअर मोटर टाकी उध्दव व्यवहारे रिबोअर पाणी टाकी | २८२६४३/- | २८२६/- | ५००/- | ३ महिने | सु.बे.अ. |
| १३ | आण्णाभाऊ साठे नगर भागातील सर्व भु. गटार दुरुस्ती व नवीन तयार करणे. | १२३६१६/- | १२३६/- | ५००/- | ३ महिने | सु.बे.अ. |
| १४ | भांगे वस्ती पाणीटाकी ते प्रकाश गिड्डे येथे पाण्याची नवीन पाईपलाईन करणे. | ६९०००/- | ६९०/- | ५००/- | ३ महिने | सु.बे.अ. |
| १५ | प्रभाग क्र.२मधील कन्याशाळा अंगणवाडी समोर पेव्हर ब्लॉक बसविणे. | १५६१५६/- | १५६२/- | ५००/- | ३ महिने | सु.बे.अ. |
| १६ | आंबेडकर नगर विष्णू जाधव नवीन घर ते औंदूबर पाटोळे वस्ती रस्ता सिमेंट क्रॉक्रीट. | २७७९९५/- | २७८०/- | ५००/- | ३ महिने | सु.बे.अ. |
| १७ | कुर्डवाडी पंढरपूर रस्ता दादा जाडकर वस्ती ते बरवडे शिंदे वस्ती रस्ता मुरुमीकरण करणे. | १५६१५६/- | १५६२/- | ५००/- | ३ महिने | सु.बे.अ. |
| १८ | गोरे वस्ती येथे रोडमेधर ते वासू जाधव घर रस्ता क्रॉक्रेट करणे. | १७०४८०/- | १७०५/- | ५००/- | ३ महिने | सु.बे.अ. |

टीप: १) कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी दि.३०/०७/२०२४ पासून २) भरलेल्या निविदा स्वीकारण्याचा दि.०६/०८/२०२४ पर्यंत सकाळी १० ते ५ वाजेपर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय मोडनिंब ३) निविदा उघडणेचा दि.०८/०८/२०२४ रोजी स.१०.३० वाजता ४) निविदे संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ व २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळेल. ५) निविदा मंजूर,नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा निविदा रद्द करण्याचा अधिकार मा.सरपंच यांना राखुन ठेवला आहे.निविदा फॉर्म सुट्टीचे दिवस वगळून मिळतील व स्वीकारले जातील.

**सही/- ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत,मोडनिंब,ता.माढा,जि.सोलापूर**

**शिक्का**

**सही/- सरपंच**
**ग्रामपंचायत,मोडनिंब,ता.माढा,जि.सोलापूर**

# कोविडच्या भीषण काळात जीवदान देणारे डॉक्टर रुग्णांसाठी देवदूतच- जिल्हाध्यक्ष संतोष पवार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रवादी काँग्रेस पाटीर्चे राष्ट्रीय अध्यक्ष श्री अजितदादा पवार साहेब तसेच प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त 'जनविश्वास सप्ताह' अंतर्गत डॉक्टर सेलच्या वतीने आरोग्य क्षेत्रातील समाजकायार्ची दखल घेऊन विशेष पुरस्कार गेले कित्येक वर्ष डॉक्टर व आरोग्य विभागात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा विशेष गुणगौरव पुरस्कार 2024 देऊन राष्ट्रवादी भवन येथे गौरवण्यात आले.सुरुवातीस माजी मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून पुढील कार्यक्रमाची सुरुवात झाली.सुरुवातीला व्यासपीठावर उपस्थित असलेल्या मान्यवरांचा सत्कार संपन्न झाला.





प्रस्ताविकेत डॉक्टर सेल विभागाचे अध्यक्ष डॉक्टर संदीप माने यांनी कार्यक्रमाची रुपरेषा स्पष्ट केली. डॉक्टर माने यांनी त्यांच्या भाषणात covid-19 या भीषण काळात देवदूताप्रमाणे धावून आणले आणि समाजामध्ये सेवाभावी कार्य करणारे व्यक्तींचा सन्मान करण्यासाठी तसेच यांचा आदशार्ची लोकांनी प्रेरणा घेऊन समाज उपयोगी कामे करावी या उद्देशाने माननीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व खासदार सुनील तटकरे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त व जनविश्वास सप्ताह अंतर्गत आज गुणगौरव पुरस्काराचा उपक्रम घेण्यात आला.

डॉक्टर विनायक टेंभुर्णीकर यांनी त्यांच्या भाषणात covid-19 भीषण काळात उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तिमत्त्वांना सन्मान डॉक्टर सेल विभागाचे अध्यक्ष संदीप माने व कार्याध्यक्ष डॉक्टर महेश वसगडेकर यांनी आयोजित करून पुरस्कार पुरस्कार दिला त्यांना व्यासपीठ निर्माण करून देण्याचे काम केले आहे. त्यांच्या या कायार्चे विशेष कौतुक यावेळी करावसं वाटते

डॉ निलरोहीत पैकी यानी मनोगतात बोलताना सांगितल की गेली अनेक वर्ष आरोग्य सेवा करीत असून कोरोनाचा भयानक काळ आपल्या पिढीने अनुभवला खूप प्राणहानी झाली डॉक्टरांनी जिवाचे रान करीत ती कोरोनेची लाट आटोक्यात आणली राष्ट्रवादी कडून सन्मान होतो त्याचा आनंद व्यक्त केला.


जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ पवार यांनी त्यांच्या भाषणात covid-19 काळात स्वतःच्या जीवाची पर्वा न करता रुग्णांचे उपचार करून देव दूताप्रमाणे अनेकांचे प्राण वाचवले डॉक्टर हे रुग्णांसाठी देवदुतच आहेत म्हणून या देवदूतांचा सन्मान डॉक्टर सेल विभागाचे अध्यक्ष डॉ. संदीप माने कार्याध्यक्ष महेश वसगडेकर यांनी केला . या सत्य उपक्रमाचे विशेष कौतुक करून सर्व गुणगौरव पुरस्कार प्राप्त मान्यवरांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शहर जिल्हा च्या वतीने अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या येणाऱ्या काळात राजाचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व प्रदेशाध्यक्ष खासदार सुनीलजी तटकरे साहेब वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ साहेब अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मराव बाबा आत्राम साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली डॉक्टर संघटनेच्या ज्या काय अडीअडचणी असतील त्या सोडवण्याचा जिल्हा समन्वयक यशवंत तात्या माने त्याचबरोबर सर्व माज्या सहकाऱ्यांना घेऊन सोडवण्याचा प्रयत्न करू.

डॉक्टर सेलच्या वतीने गुणगौरव पुरस्कार 2024 चे मानकरी निमा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विनायक टेंभुर्णीकर, डॉ. निल रोहित पैकी डॉ.रवी गायकवाड,निमा संघटनेचे शहराध्यक्ष डॉ.रवी गायकवाड डॉ.शिवाजी पाटील डॉ.अनिल काळे डॉ.प्रतीक शिवगुंडे डॉ.विक्रम बसरगी. आरोग्य क्षेत्रातील पुरस्कर्ते हाजी पैगंबर शेख, सुशीला गायकवाड, जयकुमार चाबुकस्वार, अंकिता मेहता, प्रशांत शिंदे अंबादास धायगुडे, भागप्पा प्रसन्न, प्रज्ञा जोशी, सागर गोरले, गजानन कोळी, बसवराज कोळी इत्यादी यांचा सन्मान जल्लोषपूर्ण वातावरणात संपन्न झाला. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ पवार कार्याध्यक्ष जुबेर भाई बागवान, जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले, माजी नगरसेवक नारायण माशाळकर, ज्येष्ठ नेते हेमंत चौधरी, माझी परिवहन सभापती आनंद मुस्तारे, महिला आघाडी प्रदेश सरचिटणीस लताताई ढेरे, सेवादल अध्यक्ष प्रकाश जाधव, महिला आघाडी अध्यक्ष संगीता जोगधनकर, कार्याध्यक्ष चित्रा कदम, युवक अध्यक्ष सुहास कदम कार्याध्यक्ष तुषार जक्का, प्रदेश युवक सरचिटणीस खलिल शेख युवती अध्यक्ष किरण माशाळकर युवक समन्वयक महेश कुलकर्णी, संघटक दत्तात्रय बडगंची, प्रवक्ते नागेश निंबाळकर, सामाजिक न्याय विभाग कार्याध्यक्ष अनिल बनसोडे, वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख बसवराज कोळी, मुख्य संघटक शहर उत्तर विधानसभा प्रकाश झाडबुके, दक्षिण विधानसभा अध्यक्ष प्रियाताई पवार, मध्य विधानसभा कार्याध्यक्ष शोभा गायकवाड,प्राजक्ता बागल सोशल मीडिया शहर जिल्हाध्यक्ष वैभव गंगणे, कार्याध्यक्ष सोमनाथ शिंदे, पल्लवी पवार, शामराव गांगर्डे, डॉक्टर सेल विभागातील डॉक्टर राजीव पटनी, डॉक्टर उमेश कराळे, डॉक्टर अशोक अनपट, डॉक्टर निलेश खंडागळे, यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सर्वच प्रमुख पदाधिकारी महिला नागरिक यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सेवा दल अध्यक्ष प्रकाश जाधव प्रस्ताविक डॉक्टर सेल विभागाचे अध्यक्ष डॉ. संदीप माने, वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख बसवराज कोळी यांनी आभार प्रदर्शन केल.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मदन मुळे यांनी अथक परिश्रम घेतले.

# ई-पॉस मशिनबाबतच्या तांत्रिक अडचणी दूर करण्याच्या सूचना

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या संकणकीकरण प्रकल्पाची अंमलबजाणी सुरू आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेतील लाभार्थ्यांचे बायोमॅट्रिक ओळख पटवून अन्नधान्य वितरणासाठी रास्तभाव दुकानांमध्ये ४-जी तंत्रज्ञान असलेल्या ई पॉस मशीन बसवण्यात आल्या आहेत. या ई-पॉस मशिनमधून अन्नधान्य वितरणामध्ये काही तांत्रिक अडचणी येत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या अनुषंगाने ई-पॉस प्रणालीमधील तांत्रिक अडचणी तातडीने दूर करण्याच्या सूचना अन्न व नागरी पुरवठा विभागाने दिल्या आहेत. या तांत्रिक अडचणी एनआयसीकडील धान्य वितरण प्रणाली, क्लाऊड सर्व्हरशी संबंधित असल्याचे प्रथम दर्शनी दिसून आले आहे. या तांत्रिक अडचणी दूर करण्यासोबतच राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेतील एकही पात्र लाभार्थी अन्नधान्यापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे. याबाबत युद्धपातळीवर उपाययोजना करण्यात येत असून अडचणी लवकरच दूर होतील अशी माहिती अन्न व नागरी पुरवठा विभागाने दिली आहे.

## कटूसत्य शब्दकोडे क्र.९३



**उभे शब्द :** १) महाराष्ट्राचे एक उपमुख्यमंत्री २) कविता, काव्य ३) खोदलेले खंदक ४) कमजोर ५) भारतीय क्रिकेट संघाचा एक माजी कर्णधार ६) व्रण, ओळ (ग्रामीण भाषेत) ११) दुर्दशा, वाईट स्थिती, **अपेष्टा १२) उणीव, टंचाई १३) उजाड, ओसाड १५) काकाची पत्नी १७) कष्ट, परिश्रम १९) वतनाचा मालक २०) शिक्षा २२) एक म्हण-उथळ पाण्याला खळखळाट **२४) महाराष्ट्राचा पूर्व-दक्षिण जिल्ह्यांचा भाग २५) दोन मिनिटात तयार होणारी, लहान मुलांच्या आवडीचा पदार्थ ज्याच्यावर सरकारने बंदी आणली होती २७) दु:ख (हिंदीत) २९) मराठी वर्षातील अकरावा महिना ३०) विक्रम गोखले, दिलीप प्रभावळकर अभिनीत राजकारणावरील चित्रपट ३१) विदेशी मद्य ३२) श्रीकृष्णाचा भाऊ ३३) बोलावणे, हाक ३७) लोकसभा सदस्य ३९) राष्ट्रवादीचे एक नेते-छगन **** ४२) संशय हिंदीत) ४३) जपानी जाड पैलवान ४५) विषमच्या विरूध्दार्थी ४७) होता जिवा म्हणून वाचला ** ४८) फटाक्याची माळ, शिक्षकांना या नावाने संबोधतात

**आडवे शब्द :** १) काँग्रेस पक्षाचे एक नेते
४) आ. नितेश राणे यांचा मतदारसंघ ७) नवरा मुलगा, आशिर्वाद
८) सीतापती ९) एक म्हण-सुंभ जळाला तरी ** जळत नाही
१०) पाणी पिण्याची तीव्र इच्छा, तृष्णा १२) भवा उलट लिहा
१४) आयपीएलमधील एक अष्टपैलू खेळाडू-*** पंड्या
१६) क्षण (हिंदीत) १७) स्वर्गातील एक अप्सरा १८) श्रीकृष्णाची आई
२०) संगत, सोबत २१) दोघांमधील अंतर, फरक २३) मुस्लिम बांधवांचा एक पवित्र सण २६) गन उलट लिहा २८) तमाशातील कलावंत
३२) सुक्या मेव्यातील एक पौष्टीक घटक ३३) बारा गुणिले पाच
३४) वास्तू, निवास ३५) थंडीमध्ये गळ्याभोवती गुंडाळतात
३६) रूग्णालय ३८) चुलत्यांना वा मावशीच्या पतीस या नावाने संबोधतात
४०) मच्छर ४१) बे दुणे ४२) लाज ४४) गुलाम
४६) समीर भुजबळ या जिल्ह्यातील आहेत ४८) सर्व (हिंदीत)
४९) मुस्लिम बांधवांचा एक सण
५०) गुटख्याप्रमाणे एक अंमली पदार्थ
५१) भारतातील दक्षिणेकडील एक राज्य

### शब्दकोडे क्र. ९२ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ला | ल | कृ | ष्ण | अ | ड | वा | णी | | प्र | हा | र |
| ल | ग | | | र | ब | र | | द | ण | क | ट |
| ब | ट | वा | | विं | | क | | हा | व | | र |
| हा | | न | व्व | द | | री | म | | | प | ट |
| दू | | र | | के | क | | ग | ड | क | री | |
| र | मा | | न | ज | रा | न | ज | र | | म | त |
| शा | ल | | वा | री | | व | | पो | क | ळ | |
| स्त्री | | क | ज | वा | | ल | व | क | र | | दा |
| | घा | ट | | ल | स | | धू | | क | स | म |
| ब | र | क | त | | म | नी | | ग | री | ब | |
| द | | स | र | का | र | | प | रा | त | | कि |
| क | ल | र | | न | | स | र | डा | | दि | ल्ली |


# Classified - छोटी जाहीरात

## विक्री

विविध डिझाईनचे फॅशनेबल स्ट्रेचेबल ब्लाउज विक्रीसाठी उपलब्ध. रेडिमेड ब्लाउज विक्रीचे प्रसिद्ध शॉप. रसगंध लेडीज वेअर, नवी पेठ, दिवेकर बेकरी समोर, सोलापूर
**मो - 9890232227**

## विकणे आहे

सोलापूर शहरातील चांगल्या लोकवस्तीतील ST स्टॅन्ड व रेल्वे स्टेशन जवळ आवंतीनगर, शरद पवार शाळेजवळ, लोकमंगल ऑक्सिपार्क, येथील अ विंग मधील ७०४ नंबरचा फ्लॅट विकणे आहे.
**संपर्क:**
**9881361260**

## पाहिजेत

सोलापूरात कामासाठी पाहिजेत. कॉम्प्युटर ऑपरेटर, अकाउंटंट, टेलीकॉलर, माकेर्टींग एक्झिक्युटिव्ह, सेल्समन, वर्क फ्रॉम होम डाटा एन्ट्री (लिखाण व टायपिंग काम) उपलबध आहे.
संपर्क: **9591409911 / 9272021110**

## निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अॅडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

## सद्गुरू दर्शन टूर

12/7/2024 **काशी अयोध्या, 6 ज्योतिर्लिंग,** फक्त 9000 रु. खर्च, **अष्टविनायक दर्शन,** 24/7/2024, 3000 रु. खर्च, **रामेश्वर कन्याकुमारी** 12000 रु. खर्च, बुकींग चालू आहे.
**संपर्क : 7083214757 मायनाळे**

(सरकार मान्य)

## अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण


**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहितातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


## नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...



दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)



**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
**फोन: 9552619752**
कॉल/व्हॉटस्अॅप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

## R.K कन्स्ट्रक्शन्स्

इन्फ्रास्ट्रक्चर, इंडस्ट्रीज, अपार्टमेंट यामध्ये सर्व सल्ल्याबाबत तत्पर...



इंजि. स्वप्निल पोपट कदम M.E. (Structure) B.E. (Civil)
Mo. 9552547272, 8788832033

# अकलूज येथील राणीताई बनपट्टे यांची समाज कार्यात उत्तुंग भरारी

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** जिथे चुकीचे दिसत आहे, तिथे आम्ही गप्प बसणार नाही! चुकीच्या विरुद्ध आमचा लढा सुरू असेल, म्हणूनच मी, समाज सेवेचा विडा उचलून, जनतेला न्याय देण्याचा प्रयत्न करत आहे असे ठणकावून सांगणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या राणीताई बनपट्टे यांचे, सध्या सर्वस्तरातून कौतुक होताना दिसत आहे.

नियतीने जन्मताच अखंड आयुष्यासाठी, अपंगत्व दिले. परंतु यामुळे निराश न होता, प्रबळ इच्छाशक्तीच्या बळावर राणीताई बनपट्टे या, उत्कृष्ट समाजकारणाची धुरा सांभाळत आहेत.त्यांनी लोककल्याणकारी असे अनेक विधायक कार्य करून दाखवले व दाखवत आहेत. समाजकार्य करीत असताना, अत्यंत पारदर्शकपणे अंमलबजावणी करत, राणीताई बनपट्टे यांनी माळशिरस तालुक्यातील पंचक्रोशीत, आपल्या कार्याचा आणि नावाचा ठसा उमटवत, तमाम महिला भगिनीसाठी त्या आदर्श ठरल्या आहेत.



संयम, नम्रता, शिस्तप्रिय आणि समस्त समाजासाठी धाऊन जाणाऱ्या राणीताई बनपट्टे समाज कार्याशी एकनिष्ठ राहिल्या. सामाजिक पटलावरील रणरागिणी म्हणून राणीताई बनपट्टे यांना ओळखले जाते. आजपर्यंत त्यांच्या वाट्याला, महिला आझाद केंद्र तालुका माळशिरस अध्यक्ष, भारतीय विकास परिषद अध्यक्ष, नवमहाराष्ट्र विकास मंच जिल्हा आध्यक्ष, सिटीझन फोरम ऑन हुमन राईस सोलापूर जिल्हा अध्यक्ष, जय संतोषी माता बहुउद्देशीय समाजसेवी संस्था, संस्थापक अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य जयविजय शंभुराजे बहुउद्देशीय स्वयंरोजगार सहकारी संस्था अकलूज, असे विविध प्रकारचे सामाजिक पदे आलेत, परंतु त्या पदांचा कधीच त्यांनी गर्व बाळगला नाही. आज त्या स्वस्त धान्य दुकानही चालवतात. तुम्ही स्वस्त धान्य दुकान चालवता यातून सामाज कायासाठी वेळ कसा काढता? असा प्रश्न राणी ताई बनपट्टे यांना विचारला असता त्या म्हणाल्या की, स्वस्त धान्य दुकान हे चालविणे सुद्धा समाज सेवाच आहे. स्वस्त धान्य वाटप करताना अनेक महिला भगिनी त्यांच्या समस्या व्यक्त करतात असे त्या म्हणाल्या. तर त्यांच्या स्वस्त धान्य दुकानातील ग्राहक सचिन धनंजय गायकवाड यांनी सांगितले की, गेले दोन वर्ष बनपट्टे मॅडम स्वस्त धान्य दुकान चालवतात या दोन वर्षात मला वेळेवर धान्य मिळते. एखादे वेळेस धान्य घेऊन जाण्यास उशीर झाला तर, स्वतः मॅडम फोन करून आम्हाला धान्य घेऊन जाण्यास सांगतात असे त्यांनी सांगितले. यामुळेच, जणकल्याणासाठी, समाजसेवेसाठी, सदैव तत्पर असणाऱ्या राणी ताई बनपट्टे यांची समाजसेवेबद्दल आत्मीयता दिसून येते.

# आमदार झाल्यानंतरही सोमनाथ वैद्य हे सामाज सेवा कायम ठेवतील : आ. बच्चु कडू

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** प्रत्येकाच्या मनात सेवाभाव महत्वाचा आहे. सेवाभावामुळे नातं टिकवले जाते. लाडकी बहीण योजनेप्रमाणेच लाडका आमदार हवा आहे. विविध सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून एड. सोमनाथ वैद्य हे समाजकार्य करीत आहेत. आमदार झाल्यानंतरही ते आपली समाजसेवा कायम ठेवतील, असा विश्वास प्रहार जनशक्ती पक्षाचे आमदार तथा दिव्यांग मंत्रालयाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी येथे व्यक्त केला.

स्वयंम शिक्षा एज्युकेशनल फाउंडेशनच्या वतीने द्वारकाधीश मंदिरात ज्येष्ठ नागरिकांना छत्री वाटप उपक्रम आ.बच्चू कडू यांच्या हस्ते पार पडला. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मंचावर फाउंडेशनचे संस्थापक एड. सोमनाथ वैद्य, माजी उपमहापौर राजेश काळे, अशोक मसरे, शंकर बेटगिरी, अरुण कदम, नवनाथ कदम, प्रा. मोरे नागेश कुंभार, बाळासाहेब पाटील, वसंत पवार आदी उपस्थित होते.

आ.बच्चू कडू पुढे म्हणाले, लोकप्रतिनिधींच्या मनात सेवाभाव असणे महत्त्वाचे आहे. सेवाभाव हा सर्वश्रेष्ठ आहे. सेवाभावामुळे नातं टिकवले जाते. रंजल्या गांजल्यांची,



गोरगरिबांची सेवा करणे आज गरजेचे आहे. बलिदान, त्याग आणि प्रचंड इच्छाशक्तीतून महापुरुष निर्माण होतात. राष्ट्रमाता जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराज यांनी रयत सुखी ठेवणे सर्वात महत्त्वाचे मानले. यामध्ये कोणत्याही प्रकारचा जात, धर्म, पंथ नव्हता. केवळ आणि केवळ प्रजा म्हणजे सर्व काही असेच त्यांनी मानले. राष्ट्रप्रेम महत्त्वाचे आहे. आजच्या स्थितीत जात, धर्म, पंथ डोक्यात घातले जात आहेत तर दुसरीकडे शेतकऱ्यांना भाव मिळत नाही. कष्टकऱ्यांना मजुरी मिळत नाही. त्यासाठी संघर्ष करावा लागतो.

फाउंडेशनचे संस्थापक एडवोकेट सोमनाथ वैद्य हे समाजातील विविध घटकांसाठी समाज सेवा करत आहे. त्यांची देण्याची भूमिका कौतुकास्पद आहे. लाडकी बहीण प्रमाणेच इथे आम्हाला लाडका आमदार हवा आहे. लाडका मुख्यमंत्री पाहिजे. आमदार झाल्यानंतरही ॲड. वैद्य आपली समाज सेवा कायम ठेवतील, अशी भावना यावेळी आ. बच्चू कडू यांनी व्यक्त केली.

आ. बच्चू कडू यांच्या प्रेरणेतूनचसमाजकार्य : एड. वैद्य गेल्या 19 वषापासून स्वीय सहाय्यक म्हणून कार्यरत आहे. आमदार बच्चू कडू यांच्या यांची भाषणे ऐकून मी प्रेरित झालो. वंचित, दीनदलित, गोरगरीब व ज्येष्ठ यांच्यासाठी समाजकार्य करीत आहे. आ. बच्चू कडू यांच्या आशीवार्दाने आणि मार्गदर्शनाखाली मी दक्षिण सोलापुरातून विधानसभा निवडणूक लढवीत आहे, असे स्वयंम शिक्षा फाउंडेशनचे संस्थापक एड. सोमनाथ वैद्य यांनी प्रस्ताविक भाषणात सांगितले.

# अनगरला मंजूर झालेले अपर तहसील कार्यालय त्वरित रद्द करा

## मोहोळ बार असोसिएशनचे तहसीलदारांना निवेदन



**कुरुल (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्यातील अनगर येथे नव्यानेच मंजूर झालेल्या अप्पर तहसील कार्यालयाला तात्काळ स्थगिती देऊन ते कायमचे रद्द करावे अशी मागणी मोहोळ बार असोसिएशनच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देऊन करण्यात आली आहे.

मोहोळ बार असोसिएशनच्या वतीने ॲड शमशाद मुलाणी यांनी निवेदन तहसीलदार सचिन मुळीक यांना दिले. त्यामध्ये अनगर येथे महाराष्ट्र सरकारच्या वतीने मंजूर केलेले अप्पर तहसिल कार्यालय हे मोहोळ तालुक्यातील नागरिकांच्या भौगोलिक दृष्टीने तसेच अर्थन्यायिक कामाकाजाकरीता तसेच प्रशासकीय कामाकरीता देखील सोईचे नाही. त्यामुळे शासनाच्या निर्णयाप्रमाणे अनगर येथे अप्पर तहसिल कायर्यालय, झाल्यास सोय होण्याऐवजी गैरसोय होणार आहे. तसेच मोहोळ येथील विधिज्ञांना देखील अर्धन्यायिक कामकाज करणे गैरसोईचे होणार आहे. त्यामुळे अनगर येथील अप्पर तहसिल कार्यालयाच्या निर्मितीबाबत तात्काळ स्थगिती देऊन ते कायमचे रद्द करावे अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, महसूल मंत्री, सचिव, आयुक्त व सोलापूर जिल्हाधिकारी यांना पाठविण्यात आल्या आहेत. यावेळी मोहोळ बार असोसिएशनचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री भगवती गौरीमाता प्रशालेत कौशल्य दिवस उत्साहात




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दक्षिण सोलापूर तालुक्यातील धोत्री येथील श्री भगवती गौरीमाता प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण सप्ताह अंतर्गत कौशल्य दिवस उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक गिरमल बुगडे होते.यावेळी पर्यवेक्षक सचिन देगावकर, कलाशिक्षक संजय पाटु उपस्थित होते.विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळण्यासाठी मातकाम कौशल्य अंतर्गत मातीपासून विद्यार्थ्यांनी विविध सुंदर कलाकृती बनविल्या.

बांबूकाम अंतर्गत देवघरातील फुलांची करंडी, टोपली, बांबूपासून वृक्ष संवर्धिका जाळी, दुरडी यांची विद्यार्थ्यांनी निर्मिती केले.कागदकाम अंतर्गत पर्यावरण पोषक कागदी पिशव्या, कागदी टोप्या, कागदी मुखवटे, कागदी पताके, कागदी फलक अश्या अनेक उपयुक्त साहित्याची निर्मिती केली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व प्राध्यापक, शिक्षक- शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारीवृंद यांचे सहकार्य लाभले.

# प्रताप क्रीडा मंडळाच्या राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** प्रताप क्रीडा मंडळ शंकरनगर अकलूज यांच्यावतीने श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील यांच्या जन्मशताब्दीनिमित्ताने आणि जयसिंह मोहिते-पाटील व मदनसिंह मोहिते-पाटील यांच्या अमृतमहोत्सवी वाटचाली निमित्त स. म. शंकरराव मोहिते पाटील इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च शंकरनगर, अकलूज येथे आयोजित केलेल्या 'रत्नाई चषक' राज्यस्तरीय बुध्दिबळ स्पधेर्चा बक्षीस वितरण सोहळा संपन्न झाला. सहा. मोटार वाहन निरीक्षक डॉ. राजकुमार देशमुख व मंडळाच्या अध्यक्षा कु. स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षीसे देण्यात आली. यावेळी उपाध्यक्ष पोपट भोसले-पाटील, प्राचार्य प्रवीण ढवळे, सचिव बिभीषण जाधव, स्पर्धा प्रमुख अभिजित बावळे व मंडळाचे सर्व संचालक,सदस्य उपस्थित होते.

मंडळाचे संस्थापक जयसिंह मोहिते-पाटील, शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, प्रताप क्रीडा मंडळाच्या अध्यक्षा स्वरुपाराणी मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाने कला, क्रीडा, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम राबवित आहेत.

यावेळी अध्यक्षीय मनोगतात डॉ.राजकुमार देशमुख म्हणाले की, मी प्रताप क्रीडा मंडळाचा माजी खेळाडू आहे. अभ्यासाबरोबरच जीवनात यशस्वी होण्यासाठी खेळ ही महत्त्वाचा आहे. खेळामुळे संयम, जिद्द, चिकाटी हे गुण आत्मसात होतात व त्यामुळे यश प्राप्त होते. राज्य देश व राष्ट्रीय पातळीवर प्रथम तीन क्रमांक प्राप्त करणाऱ्या खेळाडूंना शासकीय सेवेत वर्ग पाच टक्के आरक्षण आहे.

मंडळाच्या अध्यक्षा स्वरुपाराणी मोहिते पाटील म्हणाल्या की, प्रताप क्रीडा मंडळाच्या माध्यमातून १९९४ पासून गेली तीस वर्ष स्पधेर्चे आयोजन करण्यात येत आहे. यावर्षी सोलापूर, सांगली, सातारा, पुणे, अहमदनगर, कोल्हापूर, मुंबई, लातूर, धाराशिव आदी जिल्ह्यातून ११२५ खेळाडूंनी उच्चांकी सहभाग घेतला आहे.



आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात मानसिक व शारीरिक स्वास्थ्य चांगले ठेवण्यासाठी छंद जोपासणे ही काळाची गरज आहे. स्पधेर्मुळे आत्मविश्वास निर्माण होतो.स्पर्धा १० वर्षे वयोगट, १६ वर्षे वयोगट व खुला गट अशा तीन गटांसाठी आयोजित केली होती. या तिन्ही गटात माळशिरस तालुक्याच्या खेळाडूसाठी स्वतंत्र बक्षीसे होती.

स्पर्धेतील गटनिहाय प्रथम पाच क्रमांक पुढीलप्रमाणे - (१० वर्ष तालुकाबाह्य गट) श्रेयस कुदळे, सोलापूर, सिद्धांत कोठारी, बार्शी, ओम निरंजन, सोलापूर, विहान कोंगारी, सोलापूर, शौर्य कणसे, फलटण.

(१० वर्ष माळशिरस तालुका गट)अनन्या बाळापुरे, उघडे वाडी, ओम राऊत, अखिलेश भगत, अकलूज, अनहिता काळे, माळशिरस, किरण राजगे, अकलूज (१६ वर्ष तालुकाबाह्य) सागर पवार, वैराग, साईराज घोडके, सोलापूर, रुद्र फुले, बारामती, अंश खैरे, सोलापूर, जानवी साळवी, सोलापूर

(१६ वर्ष माळशिरस तालुका) रक्षिता जाधव, पार्थ पटेल, अमेय जामदार, अथर्व बोरावके, यश कुंभार, सर्व अकलूज.(खुला तालुकाबाह्य गट) दिपांकर कांबळे,फलटण, विजय पंडुवाले, सोलापूर, राज दुधाळ, बार्शी, अमर शिंदे, प्रथमेश शिंदे, बारामती.(खुला माळशिरस तालुका गट) संतोष जगताप, माळीनगर, स्वप्निल लोंढे, माळीनगर,शुभम शिंदे पाटील, खंडाळी, विवेक माने, अमोल तरटे,अकलूज स्पर्धेत प्रत्येक गटासाठी स्वतंत्र एकूण ३० बक्षिसे देण्यात आली.या मध्ये प्रथम दहा क्रमांकांना सन्मान चिन्ह व रोख बक्षीसे तर ११ ते १५ या क्रमांकांना सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येऊन गौरविण्यात आले.तर स्पर्धेतील सर्व सहभागी खेळाडूंना प्रमाणपत्र देण्यात आले.

या स्पर्धेत उत्कृष्ट पुरुष खेळाडू दादासाहेब पराडे, विनोद रणसुंबे, विराज कांबळे यांना तर उत्कृष्ट महिला खेळाडू शितल पराडे, आश्लेषा माने, शुभांगी भगत व सर्वात लहान खेळाडू मनश्री पाटील, अर्जुन सातारकर, स्वानंदी कणसे व अद्विक ठोंबरे यांना सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. सर्वाधिक सहभागी स्पर्धक असणारी प्रशाला म्हणून महर्षी शंकरराव मोहिते प्रशाला यशवंतनंगर या प्रशालेस गौरविण्यात आले. प्रशालेचे मुख्याध्यापक संजय गळीतकर यांनी सन्मान स्वीकारला. तर सर्वाधिक सहभागी स्पर्धक अकॅडमी म्हणून ब्रिलियंट चेस अकॅडमीच्या सौ. अनिता बावळे यांना सन्मानीत करण्यात आले. स्पर्धेत धाराशिव चे ७६ वर्षाचे वयोवृद्ध खेळाडू बाबुराव शेळके यांनीही सहभाग नोंदवला.

या स्पधेर्साठी ६० कॅश प्राईज, १०१ ट्रॉफीज, १०१ मेडल तसेच प्रत्येक गटात ६० पेक्षा अधिक बक्षिसे देण्यात आली. पंच म्हणून उदय वगरे, जितेंद्र वाळिंबे, युवराज पोगुल, रोहिणी तुम्मा, संध्याराणी सस्ते, दीपक क्षीरसागर, नामदेव कणसे, अक्षय कांबळे, संग्रह कांबळे, राहुल बोराटे, नितीन अग्रवाल, अली शेख, प्रभावती लंगोटे, अनिता बावळे यांनी काम पाहिले.प्रास्ताविक स्पर्धा प्रमुख अभिजित बावळे यांनी केले. सूत्रसंचालन किरण सूर्यवंशी, राजकुमार पाटील यांनी केले.

# पंढरपूर येथे 31 जुलैला विशेष शिबीराचे आयोजन

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** तालुक्यातील भटके विमुक्तांना विविध प्रकारचे दाखले, आधारकार्ड, रेशन कार्ड, मतदान ओळखपत्र आदी दाखले देण्यासाठी बुधवार दिनांक 31 जुलै 2024 रोजी सकाळी 11 ते सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत सांस्कृतीक भवन, उपविभागीय अधिकारी कार्यालय पंढरपूर विभाग पंढरपूर येथे विशेष शिबीराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली आहे.

यावेळी जात प्रमाणपत्र, रहिवाशी दाखला, जन्म दाखला, आधार कार्ड, शिधापत्रिका, मतदान ओळखपत्र, दिव्यांग प्रमाणपत्र, आयुष्यमान भारत कार्ड व सामाजिक योजना या योजनांचा नागरीकांना लाभ देण्यात येणार आहे. तरी पंढरपूर तालक्यातील नागरीकांनी या विशेष शिबीरचा लाभ घ्यावा असे आवाहनही तहसिलदार सचिन लंगुटे यांनी केले.

# करमाळ्यात संत निरंकारी मंडळाच्या शिबीरात २२५ जणांचे रक्तदान

**वाशिंबे (कटूसत्य वृत्त):-** मानव एकता दिनानिमित्त संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशन दिल्ली शाखा करमाळा यांचे वतीने आयोजित केलेल्या रक्तदान शिबीरात २२५ जणांनी रक्तदान केले.या शिबीराचे उद्घाटन दीप प्रज्वलनाने करण्यात आले. या प्रसंगी संत निरंकारी मंडळाचे सोलापूर झोनचे ज्ञानप्रचारक महादेव बिराजदार महाराज, क्षेत्रीय संचालक बाळासाहेब पवार, टेंभूर्णी ब्रँचमुखी अनिल पवार, खरेदी विक्रि संघाचे चेअरमन शंभूराजे जगताप, कमलाई साखर कारखान्याचे चेअरमन विक्रम दादा शिंदे, दत्तकला शिक्षण संस्थेचे चेअरमन रामदास झोळ, शिवसेनेचे जिल्हा समन्वयक निखिल चांदगुडे, राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष अशपाक जमादार, जि.प सोलापूरचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र बारकुंड, सरपंच रविंद्र वळेकर, प्रमोद बदे, पत्रकार अशपाक सय्यद, दिनेश मडके आदी मान्यवर उपस्थित होते.



यावेळी महादेव बिराजदार महाराज व बाळसाहेब पवार यांनी संत निरंकारी मंडळाच्या आध्यामिक व सामाजिक समाजोपयोगी मानवतावादी कायाचीं माहिती दिली.

या शिबीरात रक्तसंकलनाचे काम बार्शी येथील श्रीमान रामभाई शहा रक्तपेढी, सोलापूर येथील सिव्हिल हॉस्पिटल, श्रीम.गोपाबाई दमाणी ब्लड बँक यांनी उत्कृष्टपणे केले.

अनेक मान्यवरांनी स्वतः रक्तदान करून संत निरंकारी मंडळाच्या मानवतावादी निष्काम कार्याचे कौतूक केले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सेवादल अधिकारी रमेश वारे, भैरू वळेकर, वैशाली सरडे, मुकुंद साळूंके, अंगद पडवळे, बप्पा धडस, एकनाथ निमगीरे, मनधीर शिंदे तसेच सर्व महिला व पुरुष सेवादल यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनिल शिंदे यांनी केले तर सर्व रक्तदात्यांचे मान्यवरांचे व रक्तपेढीच्या सर्व डॉक्टरांचे आभार करमाळा ब्रँच मुखी पोपट थोरात यांनी मानले.

# एस व्ही सी एस प्रशालेत शिक्षण सप्ताह उत्साहात साजरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त दिनांक 22 ते 28 जुलै दरम्यान एस व्ही सी एस हायस्कूल एमआयडीसी येथे मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला.

दिनांक 22 जुलै रोजी अध्ययन अध्यापन साहित्य दिवस या उपक्रमामध्ये भिंती पत्रके, शैक्षणिक साहित्य प्रदर्शन, हस्तलिखित प्रदर्शन, 23 जुलै रोजी मूलभूत संख्याज्ञान व साक्षरता दिवस यामध्ये गणितीय परिपाठ व निपुण प्रतिज्ञा, गणित तज्ञांची माहिती, गणितीय कथाकथन, कोडी व खेळ, 24 जुलै रोजी क्रीडा दिवस यामध्ये क्रीडा परिपाठ, क्रीडा शपथ, देशी खेळाचे महत्व, खेळ व व्यायाम, 25 जुलै रोजी संस्कृतिक दिवस यामध्ये पारंपरिक वेशभूषा, नृत्य कथाकथन गायन आणि एकांकिका, २६ जुलै रोजी कौशल्य व डिजिटल उपक्रम दिवस यामध्ये, बांबू कला, प्रथमोपचार, २७ जुलै रोजी मिशन लाईफच्या दृष्टीक्षेपात इको क्लब उपक्रम व शालेय पोषण दिवस यामध्ये इको क्लब ची स्थापना, वृक्षारोपण शालेय पोषण आहार व त्यातून मिळणारा उष्मांक व 28 जुलै रोजी समुदाय सहभाग दिवस यामध्ये विद्यार्थी नोंदणी, स्वयंसेवक प्रसिद्धी, प्रभात फेरी, पोस्टर मेकिंग घोषवाक्ये, विद्यार्थी माहिती आदी उपक्रम उत्साहत साजरी करण्यात आले हे उपक्रम यशस्वी करण्यासाठी उपमुख्याध्यापक धनंजय नकाते पर्यवेक्षक संतोष कुमार तारके व शिक्षक शिक्षिकांनी परिश्रम घेतले.

# मतदार यादीचा सुधारित विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम जाहीर

## मतदारांनी नाव नोंदणी करण्याचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार याद्यांचा १ जुलै २०२४ या अर्हता दिनांकाच्या आधारावर 'विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम (दुसरा)' राबविण्यात येत आहे. या कालावधीत मतदारांनी नोंदणी केलेले नाव, पत्ता, वय व इतर तपशील योग्य असल्याची खात्री करून घ्यावी. तसेच त्यात दुरुस्तीची आवश्यकता असल्यास या कालावधीत संबंधित तपशील दुरुस्त करुन घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

या कार्यक्रमाअंतर्गत शुक्रवार 2 ऑगस्ट रोजी प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या प्रारुप यादीच्या अनुषंगाने मतदार यादीवरील दावे व हरकती शुक्रवार 2 ऑगस्ट ते शुक्रवार 16 ऑगस्ट या कालावधीत स्विकारण्यात येणार आहे. प्राप्त हरकती आणि आक्षेपांवर 26 ऑगस्टपर्यंत कार्यवाही करण्यात येईल. त्यांनतर मंगळवार 27 ऑगस्ट रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

तसेच मतदार नोंदणी नियम, 1960 मध्ये देखील सुधारणा करण्यात आलेल्या असून, दि. 1 जानेवारी, 1 एप्रिल, 1 जुलै व 1 ऑक्टोबर या चार अर्हता दिनांकावर 18 वर्ष पूर्ण झालेल्या व त्यावरील सर्व नागरिकांनी www.voters.eci.gov.in व Voter helpline App (VHA) च्या माध्यमाने नोंदणी करावी. मतदार यादीमध्ये आपले नावं आहे कि कसे हे शोधण्यासाठी www.electoralsearch.eci.gov.in या संकेतस्थळाचा वापर करावा. तसेच आपल्या क्षेत्रातील मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय व सहा. मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा मतदार केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) किंवा दुरध्वनी क्रमांक 1950 यावरती संपर्क साधावा.

# अभय योजनेच्या दुस-या टप्प्यास 31 ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यात मुद्रांक शुल्क चुकविणा-यांसाठी राबविण्यात येणाऱ्या अभय योजनेच्या दुसऱ्या टप्प्यास 31 ऑगस्ट 2024 पर्यत मुदतवाढ देण्यात आली आहे. तरी सदरील योजनेचा लाभ सोलापूर जिल्हयातील जास्तीत जास्त नागरीकांनी घ्यावा असे आवाहन सह जिल्हा निबंधक वर्ग-1 तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, पी. जी. खोमणे, यांनी केले आहे.

ही मुदतवाढ देताना आता महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास महामंडळ (म्हाडा), शहर आणि औदयोगित विकास महामंडळ (सिडको), महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ (एमआडीसी); तसेच महानगरपालिका, नगरपंचायतीच्या जागांवर विकसित झालेल्या इमारतींमधील रहिवाशांनाही योजना लागू करण्याचाही निर्णय सरकारने जाहीर केला आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या जमिनीवर वसलेल्या नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थेने निवासी किंवा अनिवासी युनिट्स बाबतचे पहिले वाटप पत्र किंवा शेअर सर्टिफिकेट किंवा स्टॅम्प नसलेल्या कागदावर किंवा लेटर हेडवर जारीकेलेले किंवा अंमलात आणलेले करार. (म्हाडा) आणि तिची विभागीय मंडळे किंवा शहर आणि औदयोगिक विकास महामंडळ ऑफ महाराष्ट्र लिमिटेड (सिडको) किंवा महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) किंवा महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत किंवा विकास किंवा नियोजन प्राधिकरणाने मंजुर केलेले किंवा स्थापन केलेले यांना लागु राहील.

# राजराजेश्वरी प्राथमिक शाळेत शिक्षण सप्ताह उत्साहात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विनायक नगर येथील राजराजेश्वरी बालक मंदिर प्राथमिक शाळेत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त शिक्षण सप्ताह उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका वैशाली कुंभार होते.



शासनाच्यावतीने दि. २२ जुलै ते २८ जुलै पर्यंत आयोजित शिक्षण सप्ताहात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. सोमवार दि. २२जुलै रोजी अध्ययन अध्यापन साहित्य दिवस, मंगळवार दि.२३ जुलै रोजी मूलभूत संख्याज्ञान व साक्षरता दिवस, बुधवारी दि. २४ जुलै रोजी क्रीडा दिवस , गुरुवार दि. २५जुलै रोजी सांस्कृतिक दिवस, शुक्रवार दि.२६ जुलै रोजी कौशल्य व डिजिटल उपक्रम दिवस, शनिवार दि.२७ जुलै रोजी

मिशन लाईफच्या दृष्टीक्षेपात इको क्लब व शालेय पोषण दिवस तर रविवार दि. २८ रोजी समुदाय सहभाग दिवस आदी उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. या शिक्षण सप्ताहांतर्गत येणाऱ्या प्रत्येक उपक्रमात पालक व शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी स्वतःहून आनंदाने, हिरहिरीने व मनापासून सहभाग घेतले. मुख्याध्यापिका वैशाली कुंभार म्हणाले,आजचा विद्यार्थी हा मोबाईलच्या युगात पुढे जात आहे. हि बाब शासनाच्या लक्षात आल्याने विद्यार्थ्यांना मोबाईल पासून परावृत्त करण्यासाठी व दूर ठेवण्यासाठी शिक्षण सप्ताहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध उपक्रमात सहभाग करुन घेऊन त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव व प्रोत्साहन मिळण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यात आले आहे. खरोखरच विद्यार्थी या सप्ताहात आंनदी आनंद दिसून आले. शिक्षण संकुलातील सर्व पालक, शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. शिक्षण सप्ताह यशस्वी होण्यासाठी वैशाली गुजर, हणमंत कुरे, श्रेयस बिराजदार, बसवराज बिराजदार, लक्ष्मण कांबळे, विशाल खाडे, बजरंग शिरसाट, अमोल गुड्डेवाडी, मल्लिकार्जुन बिराजदार, किरण साळुंखे, रविकांत पोतदार, महेंद्र वाघमारे, नागेश कळंत्री,सुजाता फुलारी,शितल चमके, उज्वला भांड, शारदा लोमटे, आशाराणी गायकवाड,वंदना तेली, गौरी रेके, मंगल स्वामी आदींनी परिश्रम घेतले.